भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री आणि उरुग्वेचे परराष्ट्र व्यवहार मंत्री यांच्या सह-अध्यक्षतेखाली भारत-CELAC परराष्ट्र मंत्र्यांची बैठक

संयुक्त राष्ट्र महासभेच्या (UNGA) 81व्या सत्राच्या पार्श्वभूमीवर 22 सप्टेंबर 2026 रोजी न्यूयॉर्क येथे, भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी उरुग्वेचे परराष्ट्र व्यवहार मंत्री श्री. मारिओ लुबेटकिन यांच्यासमवेत भारत-CELAC विस्तारित ट्रोइका बैठकीचे सह-अध्यक्षपद भूषविले. सेंट लुसियाचे परराष्ट्र व्यवहार मंत्री श्री. अल्वा बॅप्टिस्टे यांनी ट्रोइकामधील त्यांच्या भूमिकेची रूपरेषा स्पष्ट केली.

2. भारत-CELAC परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीला मोठ्या प्रमाणात सहभाग लाभला. CELAC च्या 33 सदस्य देशांपैकी 30 देशांनी या बैठकीत सहभाग नोंदविला. यामध्ये 16 परराष्ट्र मंत्र्यांसह 05 उप-मंत्रीस्तरीय प्रतिनिधींचा सहभाग होता. उरुग्वे, सेंट लुसिया, अँटिग्वा आणि बार्बुडा, बार्बाडोस, बोलिव्हिया, कोस्टा रिका, क्युबा, गयाना, हैती, जमैका, निकाराग्वा, सेंट किट्स आणि नेव्हिस, सेंट व्हिन्सेंट आणि ग्रेनेडाइन्स, त्रिनिदाद आणि टोबॅगो तसेच व्हेनेझुएला या देशांचे परराष्ट्र व्यवहार मंत्री बैठकीत सहभागी झाले.

3. 2025–26 मध्ये भारत-CELAC द्विपक्षीय व्यापार $50 अब्ज हा टप्पा गाठण्याच्या महत्त्वपूर्ण कामगिरीचे स्वागत केले आणि व्यापार वाढीसाठी असलेल्या मोठ्या संभाव्यतेवर देखील भर दिला. भारत-CELAC सहकार्य मजबूत करणे, व्यापार आणि विकासविषयक भागीदारी वाढविणे तसेच बहुपक्षीयतेच्या माध्यमातून जागतिक आव्हानांना सामोरे जाणे यावरही चर्चा करण्यात आली. राजकीय संवाद, आर्थिक सहकार्य आणि नागरिक परस्पर आदान-प्रदान अधिक दृढ करण्याच्या महत्त्वावर उभय बाजूंनी भर देण्यात आला. तसेच सहकार्याचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी संस्थात्मक यंत्रणा स्थापन करण्याच्या दिशेने काम करण्यासही त्यांनी सहमती दर्शविली.

4. 2025 आणि 2026 मध्ये झालेल्या भूकंपांनंतर जमैका, व्हेनेझुएला आणि कोलंबियाला भारताने तातडीने दिलेल्या मानवतावादी प्रतिसादाबद्दल CELAC सदस्य देशांनी भारताचे कौतुक केले.

5. व्यापार, हवामानविषयक कृती, नवीकरणीय ऊर्जा, डिजिटल परिवर्तन, आरोग्य, अन्नसुरक्षा, महत्त्वपूर्ण खनिजे, पायाभूत सुविधा उभारणी, अंतराळ सहकार्य, कृषी, HADR तसेच क्षमता-वृद्धी अशा विविध क्षेत्रांमध्ये CELAC देशांसोबतची भागीदारी मजबूत करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा भारताने पुनरुच्चार केला. परस्पर लाभासाठी सहकार्याचा विस्तार करण्याच्या महत्त्वावर उभय बाजूंनी भर दिला.

6. या बैठकीत लॅटिन अमेरिका आणि कॅरिबियन प्रदेशासोबत भारताचा वाढता सहभाग तसेच भागीदारी अधिक उंचावण्याची दोन्ही बाजूंची परस्पर इच्छा अधोरेखित झाली.

न्यूयॉर्क

22 सप्टेंबर 2026